वि. दि. दावा क्र. ५१३-२०२३
निशाण क्र. ११८

**प्रतिवादी १ ते ३ तर्फे सा.क्र. ६ यांना शपथ देण्यात आली.**

**नाव – अजिंक्य गोरख पवार, वय– ३३ वर्षे,**

**व्यवसाय – बांधकाम साहित्य पुरवठा दुकान.**

**रा. करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर.**

**प्रतिवादी १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र.०६ यांची सरतपासणी प्रतिवादी १ ते ३ तर्फे वकील श्री. बी.टी.देवी यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

गणेश स्टोन प्लॉलिशिंग ॲण्ड कटिंग असे माझे दुकानाचे नाव आहे. मी माझे दुकानाचा प्रोप्रायटर आहे. मी प्रतिवादी बळीराम चिंचकर यांना ओळखतो. त्यास मी बांधकाम साहित्य पुरवठा केले आहे. त्याला मी सिमेंट, चॅनल, पाईप व पत्रा अशा विक्री केलेल्या आहेत. त्याने मला त्याची रक्कम वेळोवेळी दिलेली आहे. मी त्यास रक्कम स्वीकारलेनंतर दोन पावत्या दिलेल्या आहेत. सदर पावत्या आर्टिकल ओ आणि औ वरती आहेत. आता मला अभिलेखावरील आर्टिकल ओ आण औ वरील पावत्या दाखविल्या ह्या त्याच पावत्या आहेत ज्या मी प्रतिवादीला दिल्या होत्या. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या दोन्ही पावत्यांना अनुक्रमे **निशाण क्र. ११९ व १२०** देण्यात येतो.

**प्रतिवादी १ ते ३ यांचे तर्फे साक्षीदार क्र.०६ यांची उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. बी.आर.राऊत यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

मी माघील सात वर्षापासुन हा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे मुंबई संस्था व दुकाने अधिनियमा अंतर्गत दिलेला परवाना न्यायालयात आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझेकडे दुकान चालविण्याचा परवाना नाही म्हणुन ते मी आणलेले नाही.

प्रश्न – ज्या वेळेस तुम्ही पावती देता त्या पावतीवरती, जी.एस.टी. क्रमांक व व्हॅट क्रमांक नमुद असणे गरजेचे असते.?

उत्तर – पावत्या दिल्या त्यावेळी जी.एस.टी. क्रमांक नव्हते.

हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी व्हॅट नंबर होता. हे म्हणणे खरे नाही की, गणेश स्टोन कटिंग आणि पॉलिशिंग या दुकानाचा प्रोप्रायटर मी आहे असे

दर्शिविणारा माझेकडे कोणताही शासकीय दस्ताऐवज नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीस दिलेले दोन्ही दस्त पावती देयक नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी पावती पुस्तेकेतील एक पावती ग्राहकास देतो त्यावेळी त्याची कार्बनयुक्त प्रत आमचे कडे असते. हे म्हणणे खरे आहे की, माझेकडुन नेलेले सामान बळीराम चिंचकर यांनी कोठे वापरले याचे मला ज्ञात नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी व बळीराम चिंचकर यांची पूर्वीपासुन चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, सद्या आमची चांगली ओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, बळीराम यांचे सोबत असलेल्या चांगल्या ओळखी वरुन मी आज रोजी न्यायालयात साक्ष देणेकामी आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे सांगण्यावरुन मी साक्ष देणेकामी आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी पुराव्यामध्ये खोटया बाबी न्यायालयात कथन करत आहे.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि. १७–०३–२०२६